# गोल्डन फायबर मधील पाणी बनले विष

## कंपनीतील 100 च्या वर कामगारांना विषबाधा

## 41 कामगार जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल

## पप्पु पाटलांनी धाव घेवून वाचविले प्राण

*महासागर प्रतिनिधी*

*अमरावती( दि.12 )-येथील नांदगाव पेठ एमआयडीसीमध्ये लिनन वस्त्राचे धागे बनविणारी कंपनी गोल्डन फायबर मधील पिण्याचे पाणी विषाक्त झाल्याने 100 हून अधिक कामगारांना विषबाधा झाल्याची घटना रविवारी( दि.12 ) रोजी दुपारी उघडकीस आली. येथील सुरक्षा अधिकारी जे.एस.रावत हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न करित असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते मंगेश उर्फ पप्पु पाटलांनी स्वत- पोलीसांना सोबत घेत कंपनीत घूसून हा प्रकार उजेडात आणल्याने अनेक कामगारांचे प्राण वाचले. याप्रकरणी दोषी व्यक्तीवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.*



### त्यांच्या बापाची जहागिरदारी नाही!



कामगारांची प्रकृती अत्यवस्थ झालेली असताना त्यांच्यावर योग्य उपचार न करता, उलट कारवाई करण्याची भाषा बोलणाऱ्या अधिकाऱ्यांनी कामगार म्हणजे त्यांच्या बापाची जहागिरदारी समजू नये. आम्ही संबधित कंपनीला भेट देवून अश्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी करणार आहो.

**बळवंत वानखडे,**
**खासदार, अमरावती.**

### कामगारांना डांबून ठेवले होते!



गोल्डर फायबर कंपनीमध्ये विषबाधा झालेल्या कामगारांना चक्क सहा तास कंपनीमध्ये डांबून ठेवले होते. कंपनीच्या अश्या अधिकाऱ्यांविरुध्द फौजदारी तक्रार करुन आम्ही त्यांचा समाचार घेवू, मी वेळीच कंपनीत पोहोचलो नसतो तर अनेक कामगारांनी आपले प्राण गमवावे लागले असते.

**पप्पु पाटील,**
**नेते, महाराष्ट्र नवनिर्माण सेना**











गोल्डन फायबर नामक कंपनीतील सुमारे 60 कामगारांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांचे बयाण नोंदविणे सुरु आहे. त्यांच्याकडून तक्रार प्राप्त झाल्यावर पुढील कायदेशिर कारवाई होईल. तसेच डॉक्टराचा अभिप्राय, दुषित पाण्याच्या अहवालावरून पुढील कारवाई केली जाईल.

**महेंद्र आंभोरे,**
**पोलिस निरीक्षक,**
**नांदगाव पेठ**

### कामगारांचा आक्रोश, रावत बनले रावण ?

माहिती आहे की, उलट्या आणि संडासमूळे मरणासन्न झालेले कामगार आपल्यावर योग्य उपचार व्हावा याकरिता आक्रोश करित होते, परंतू येथील सुरक्षा अधिकारी रावत या मजूरांना औषध घ्या, आणि कामाला लागा, अशी जबरदस्ती करित होते. रावत यावेळी रावणाच्या भूमिकेत आमच्यावर अमानुष अत्याचार करित होते, असा आरोप यावेळी काही कामगारांनी केला.

### प्रकृती बिघडलेल्या रुग्णांची नावे

दूषित पाण्यामुळे भाग्यश्री लोणारे, चित्रा तायवाडे, लीला नन्नावरे, चित्रा शंकर काने, सुमन शिंगारे, जयश्री बलविकर, शिल्पा धनसुईकार, सीमा तुपकर, मीना कांबले, वैशाली कमलकर, सोनू चव्हाण, चंदा घोडेस्वार, योगिता खोपे, अर्चना बालपांडे, प्रीति मान, लीना उईके, किरण गायकवाड, प्रफूल गजभिये, स्वाती रोकडे, अमृता कंगाले, कविता शिंगाडे, रंजना तोडके, सुवर्णा वानखडे, पूजा वानखडे, मीना तायडे, मंजू बागडे, रेश्मा तायडे, चित्रा ठाकरे, सूमन मोकटे, अक्षय उईके, प्रद्युम चोरडिया यांच्यासह आदी कामगारांचा समावेश आहे.

### विषाक्त पाणी पिल्यानेच विषबाधा ?

येथील कामगारांना सामुहिक जेवणाची व्यवस्था कंपनीकडून करण्यात आलेली नाही. हे कामगार आपआपल्या घरुन जेवणाचे डबे आणतात. येथे अप्परवर्धा धरणाहून पाणी पुरवठा होतो. हे पाणी एका टाकीमध्ये जमा होते, आणि फिल्टरव्दारे शुध्द पाणी कामगारांना पिण्यास जाते. टाकीतून आलेले पाणीच विषाक्त झाल्याचे प्रथमदर्शनी समोर आले आहे. विषबाधेचे पुरावे मिटविण्याकरिता कंपनीच्या अधिकाऱ्यांनी या टाक्याही तातडीने साफ केल्या होत्या, अशी माहिती आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.आसोले यांनी एक पथकही कंपनीत पाण्याचे नमुने घेण्याकरिता पाठविले होते. परंतू बराच वेळ त्यांना कंपनीमध्ये एंट्री देण्यात आली नाही. बराच वेळानंतर कंपनीत पथकाला एंट्री मिळाल्याची माहिती डॉ.आसोले यांनी दिली.

### 41 कामगारांना केले दाखल, 4 अत्यवस्थ

माहिती मिळताच मनसे नेते पप्पु पाटील यांनी नांदगाव पेठ पोलीस स्टेशन गाठून पोलिसांची मदत घेत गोल्डन फायबर कंपनी गाठली. त्यानंतर पोलीसांनी चौकशी केल्यानंतर लगेच 70 कामगारांना कंपनीतून बाहेर काढले. यामधील काही कामगार खासगी रुग्णालयात गेले, तर 41 कामगार जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल झाले. यामध्ये 36 महिला आणि 5 पुरुष कामगारांचा समावेश होता. यामधील चार जणांची प्रकृती अत्यवस्थ झाली होती, ज्यांना खासगी रुग्णालयात हलविण्यात आले.

### एचआर ला मारहाण, एचओडींनी मागितली माफी

कंपनीतील कामगारांना जिल्हा रुग्णालयात आणल्यानंतर कंपनीचे एचआर मंगेश रोडे येथे आले होते, त्यांना यु.स्वा.संघटनेच्या एका कार्यकर्त्याकडून मारहाण झाल्याचा प्रकार समोर आला. तर कंपनीचे एचओडी बी.एन.प्रसाद यांनी कंपनीत झालेल्या प्रकाराबाबत जिल्हा रुग्णालयात पोहोचून सर्वांची माफी मागितली.

गोल्डन फायबर कंपनीमध्ये तीन शिफ्टमध्ये जवळपास 1 हजार कामगार काम करित असल्याची माहिती आहे. शनिवारी-रविवार च्या रात्रीपासून येथील महिला व पुरुष कामगारांना उलटी व संडास चा त्रास सुरु झाला. रात्र पाळीच्या कामगारांना घरी गेल्यावर हा प्रकार जाणवत असल्याने त्यांनी आपआपल्या घराजवळील दवाखाने गाठले. त्यानंतर सकाळी 8 वाजता पहिल्या शिफ्टमधील कामगार आपल्या कामावर रुजू झाले. काम करित असलेल्या महिला व पुरुष कामगारांना अचानक गरगरणे, उलट्या होणे, संडास लागने असा त्रास जाणवू लागला. सकाळी 9 वाजतापासून या त्रासाची लागण होत असलेल्या कामगारांची संख्या वाढत गेली. त्यामूळे कंपनीतील सुरक्षा अधिकारी जे.एस.रावत यांनी खासगी डॉक्टरांना तेथे आणून कामगारांवर कंपनीच्या आवारातच उपचार सुरु केले. हा प्रकार विषबाधेचा असून या कामगारांना तातडीने कंपनी बाहेर रुग्णालयात हलविण्याचा सल्ला त्या डॉक्टरांनी दिला.

---

## महाप्रसादाच्या कार्यक्रम दरम्यान महिलेचे मंगळसूत्र उडविले

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.12 )-** नांदगाव पेठ हद्दीतील धार्मिकस्थळावरील एका महाप्रसादाच्या कार्यक्रमातून महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकाविण्यात आले. ही घटना 11 जानेवारी रोजी दुपारी 2 वाजताच्या सुमारास नांदगाव पेठ ठाण्याच्या हद्दीत घडली. या प्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संत काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सवानिमित्त नांदगाव पेठ ठाण्याच्या हद्दीतील टोलनाका परिसरात महाप्रसादाच्या कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी करण्यात आले होते. या कार्यक्रमाला सदर महिलासुद्धा उपस्थित होती. महाप्रसादाच्या कार्यक्रमात उसळलेल्या गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील 56 हजार रुपये किमतीचे 25 ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र हिसकाविले. ही बाब लक्षात आल्यावर महिलेने नांदगाव पेठ ठाणे गाठून तक्रार दाखल केली. तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा कसून शोध सुरू आहे.

## कारचालकानेच मालकाचे दीड कोटी लांबविले

### कोतवाली ठाण्यात गुन्हा दाखल


**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.12 )** - कारचालकच मालकाची दीड कोटी रुपयांची रोख घेऊन चालकाने पोबारा केल्याची घटना कोतवाली ठाण्याच्या हद्दीतील कॅम्प परिसरातील एका हॉटेलबाहेर 12 जानेवारी रोजी सकाळी 9.30 वाजताच्या सुमारास उघडकीस आली. या प्रकरणात राजेंद्र दामोदर शहा (53, रा. छत्रपती संभाजीनगर) यांच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी कारचालक प्रवीण उर्फ पंडित शेषराव केदार (32, रा. अंढेरा, बुलढाणा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिस तक्रारीनुसार, राजेंद्र दामोदर शहा (53, रा. छत्रपती संभाजीनगर) हे अजयदीप इंफ्राकॉन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत अकाउंट ऑफिसर म्हणून काम करतात. तर दिनेश प्रतापराव पाटील (55, रा. छत्रपती संभाजीनगर) हे त्यांचे बिझनेस पार्टनर आहेत. प्रवीण केदार हा राजेंद्र शहा यांच्या चालक म्हणून कार्यरत आहे.

राजेंद्र शहा हे दिनेश पाटील यांच्यासोबत प्लॉट खरेदी-विक्रीचा व्यवसाय करतात. शनिवार, 11 जानेवारी रोजी राजेंद्र शहा व दिनेश पाटील हे प्रवीण केदार याच्यासोबत कंपनीच्या कारने अमरावतीला आले होते. ते कॅम्प परिसरातील एका हॉटेलमध्ये थांबले होते. दोघांनीही त्यांच्या मालकीचे काही प्लॉट्स वेगवेगळ्या पार्टीला विकले. त्यातून त्यांना 1 कोटी 20 लाख रुपये मिळालेत. तर, राजेंद्र शहा यांनी त्यांच्या मुलाच्या लग्नासाठी 30 लाख रुपये रोख मित्रांकडून घेतले होते. ती दीड कोटींची रोकड घेऊन ते छत्रपती संभाजीनगरला जाणार होते. परंतु, रात्र झाल्याने त्यांनी शनिवारी त्याच हॉटेलमध्ये मुक्काम केला. दरम्यान, 12 जानेवारी रोजी सकाळी 9.30 वाजताच्या सुमारास दोघांनी छत्रपती संभाजीनगरला जाण्याची तयारी केली. त्यावेळी राजेंद्र शहा यांनी कारचालक प्रवीण केदार याला बोलावून घेतले. त्याने कार बाहेर काढल्यावर राजेंद्र शहा यांनी त्यात दीड कोटी रुपये असलेल्या तीन बॅग ठेवल्या. तू कारजवळ थांब, असे सांगून राजेंद्र शहा व दिनेश पाटील हे हॉटेलमध्ये नाश्ता करण्यास गेले. नाश्ता करून परत आल्यावर त्यांना कारजवळ चालक प्रवीण केदार हा दिसला नाही. त्यावेळी कार लॉक होती. त्यामुळे राजेंद्र शहा यांनी प्रवीण केदार याला मोबाइलवर कॉल केला. परंतु, त्याचा मोबाइल स्वीच ऑफ होता. त्याचवेळी तेथील वॉचमनने तुमच्या ड्रायव्हरने माझ्याकडे गाडीची चावी दिली व तो निघून गेला, असे त्यांना सांगितले. तसेच त्याने त्यांना गाडीची चावीसुद्धा दिली. राजेंद्र शहा यांनी लॉक उघडून कारमध्ये बघितल्यावर त्यात त्यांना दीड कोटींची रोकड दिसून आली नाही. त्यामुळे त्यांनी कोतवाली ठाणे गाठून तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून असून त्याचा कसून शोध सुरू आहे.

## अज्ञात व्यक्तीने पेटविली तुरीची गंजी



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.12 )** - अज्ञात व्यक्तीने तुरीच्या गंजी पेटविली

महासागर प्रतिनिधी

मोर्शी,(दि.12)-शेतमजूर संजय पांडुरंग इंगळे यांच्या मालकीच्या तुरीच्या पेंड्याला अज्ञात व्यक्तीने आग लावून दोन लाख रुपयाचे नुकसान केले. या घटनेमुळे गावात खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे शेतमजुराच्या नुकसानबद्दल हळहळ व्यक्त केल्या जात आहे.

संजय पांडुरंग इंगळे यांनी अंबाडा येथील सिराजउद्दीन यांच्या मालकीचे 6 एकर शेत लागवनसाठी मक्त्याचे घेतले होते. त्यामध्ये त्यांनी तुरीचे पीक पेरले होते. तुरीचे पिकाचे उत्पादन चांगले होईल यासाठी त्यांनी 1 लक्ष रुपये खर्च केले. गेल्या 4 दिवसापूर्वीच त्यांनी 6 ऐकरमधील तुरीचे पीक सांगून 550 पेंडा एकत्र करून खडे तयार केले. त्यासाठी त्यांनी स्थानिक अक्षय शिरभाते याचे मळणी यंत्र खड्यावर तयार ठेवलेत, पण कुणीतरी 10 जानेवारी रोजी रात्री 11 वाजताच्या सुमारात अज्ञात समाज कंटकाने संपूर्ण तुरीच्या पेंड्यावर डिझेल टाकून पेटवून दिले. यामध्ये अखेर पेंढ्या जाळून अंदाजे 2 लक्ष रुपयांचे नुकसान केलेत. स्थानिक संजय पांडुरंग इंगळे हा शेतमजूर असून ते भूमिहीन आहे. दुसऱ्याचे शेती लागवण करणे हा त्यांचा व्यवसाय आहे. समाजकंटक आणि केलेल्या नुकसानाबाबत त्यांनी मोर्शी पोलीस स्टेशनला तक्रार दिली आहे. मोर्शीचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाडा बीट जमदार संतुलाल उईके अधिक तपास करीत आहे.

## कापसाचे उत्पादन ठरताहे आतबट्टयाचे

### पांढरा सोन्याची काळी बाजु

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.12 )** - कापूस हे आपले पारंपरिक नगदी पीक आहे. कोरडवाहु शेतीत घेतल्या जाणाऱ्या या पिकावर राज्यासह देशातील बहुतांश शेतकऱ्यांचे अर्थकारण अवलंबून आहे. परंतु मागील एक-दीड दशकापासून या पांढऱ्या सोन्याची शेती आतबट्टयाची ठरली. कापुस उत्पादक शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत. कापूस पिकाचा उत्पादन खर्च सातत्याने वाढला.

कापसाचे उत्पादन कमी मिळत असुन दरही हमीभावापेक्षा कमीच मिळत आहे. शेती तोट्याची ठरत आहे. पर्यायाने आगामी हंगामात कापूस क्षेत्रात मोठी घट होईल, अशी चिंता व्यक्त होत आहे. कापसाला या दुष्टचक्रातून बाहेर काढण्याच्या घोषणा केल्या. प्रत्यक्षात मात्र या सर्वांकडूनच कापूस हे पीक दुर्लक्षित राहिले, अशी कापूस उत्पादक जी टीका करतात, ती रास्तच म्हणावी लागेल.



कापूस लागवड ते वेचणी यातील बहुतांश कामे अजूनही मजुरांकरवी होतात. यामध्ये यांत्रिकीकरण झालेले नाही. मजुरांची कमी उपलब्धता, मजुरीचे वाढलेले दर यामुळे देखील उत्पादन खर्च वाढत आहे. अशावेळी कापूस शेतीत लागवड ते वेचणी यांत्रिकीकरण वाढायला पाहिजे. कापसाच्या खेडा खरेदीत हमीभावापेक्षा कमी दर मिळतो. हमीभावाने कापूस खरेदीसाठी 'सीसीआय'ने केंद्रे उघडली आहेत.

परंतु त्यांची संख्या खूपच कमी आहे. सीसीआयच्या खरेदी केंद्रांतही नोंदणी ते प्रत्यक्ष कापसाचा काटा होईपर्यंत अनंत अडचणींचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. त्यातच आता रुईचा उतारा कमी मिळत असल्याचे कारण देत हमीदर 100 रुपयांनी घटविला आहे. कापसाच्या खरेदीत व्यापक बदल करून उत्पादकांना किमान हमीभावाचा आधार मिळायलाच हवा, अशी व्यवस्था उभी करावी लागेल. जागतिक मंदीच्या सध्याच्या काळात सूत ते कापड निर्मिती प्रक्रियाही उद्योगही ठप्प आहे. अशावेळी कापूस प्रक्रिया उद्योगातील सर्व घटकांना काही सवलती द्याव्या लागतील. कापूस, सूत, कापड निर्यातीच्या संधी शोधून त्यांची निर्यात वाढवावी लागेल. अशा प्रकारे कापसामध्ये वाण निर्मिती ते कापड निर्यातीपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यात संशोधन, सुधारणा, सवलती यामध्ये उत्पादकांना केंद्रस्थानी ठेवून बदल करावे लागतील. असे झाले तरच या पांढऱ्या सोन्याची झळाळी कायम राहील.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# निविदा घोटाळा : कर्मचाऱ्याचा बळी, आका मोकाटच!

## 50 कोटीच्या प्रशासकीय इमारत निर्माणीच्या प्रक्रीयेला गालबोट

### निविदा प्रक्रीया रद्द कधी?


### सिईओ मोहपात्रांकडून फक्त मलमपट्टी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.12 )-** प्रशासक राज मध्ये जिल्हा परिषद हे हिरवं कुरण बनले आहे, आणि अधिकारी शिंगे फुटल्या प्रमाणे मनसोक्त चरताना दिसत आहे. जिल्हा परिषद प्रशासकीय इमारत निर्माण कार्याच्या 50 कोटीच्या निविदा प्रक्रीयेत घोटाळा झाल्याचे बाहेर आलेले असताना, सिईओ संचिता मोहपात्रा यांनी फक्त मलमपट्टी करित एका कर्मचाऱ्याला निलंबित केले, मात्र अजूनही ना निविदा प्रक्रीया रद्द करण्यात आली, ना बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यावर कारवाई करण्यात आली. ना निविदा मॅनेज करणाऱ्या कंत्राटदारावर कुठली कारवाई करण्यात आली. त्यामूळे सिईओ संचिता मोहपात्राचा संशयाच्या भोवऱ्यात असल्याचा आरोप तक्रारकर्त्यांनी केला आहे.

तक्रारकर्त्यांनी सांगितले की, जिल्हा परिषदमध्ये प्रशासक राज लागल्यापासून जिल्हा परिषद बांधकाम विभाग चे कार्यकारी अभियंता यांनी निविदा सूचना काढण्याचा सपाटा लावला होता. या निविदा मर्जीतल्याच लोकांना मिळाव्या, बाहेरच्या व्यक्तीला परस्पर कटविण्याकरिता काही जाचक अटी निविदा प्रक्रीयेमध्ये टाकून ठेवल्या होत्या, ज्या अटींना शासनाचा काहीच आधार नव्हता. मर्जीतील काही निवडक कंत्राटदारांना कामे देवून आपले खिसे भरण्याकरिता हे सर्व द्रविडी प्राणायम असल्याची तक्रार महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ अमरावती व युवक काँग्रेस च्या वतीने मार्च 2024 मध्ये जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी तथा विभागीय आयुक्तांना करण्यात आली होती. त्यानंतर या तक्रारवर अनेकवेळा स्मरण पत्रसुध्दा देण्यात आले.





### घोटाळेबाजांना पाठीशी घालताहेत सिईओ

तक्रारकर्त्या संघटनेने प्रत्येक तक्रारीचे वारंवार कागदोपत्री पुरावे सादर केले, ज्यामध्ये जिल्हा परिषद सिईओंना सर्व घोटाळे हे निविदा समितीनेच केल्याचे सांगितले. तरीसुध्दा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी(सिईओ) नाममात्र चौकशी करीत घोटाळेबाजांना पाठीशी घातले असल्याचा आरोप करण्यात आला आहे. लुटारुंची अख्खी टोळी असताना फक्त टोळीतील एका प्यादा वरच निलंबनाची कारवाई करण्यात आली.

प्रत्येक कागदाचे रेकॉर्ड हे निविदा लिपिकाजवळ असते, प्रत्येक कागदावर स्वाक्षरी मात्र माझी असते. याप्रकरणी नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समितीला या लिपिकांनी रेकॉर्ड उपलब्ध करवून दिले नाही. असा ठपका त्यांच्यावर चौकशी समितीने ठेवला आहे. या समितीच्या प्राथमिक अहवालावर सिईओ मॅडमनी त्यांना निलंबित केले आहे.

**दिनेश गायकवाड**
**कार्यकारी अभियंता,**
**जिल्हा परिषद बांधकाम विभाग, अमरावती.**

### निविदा मॅनेज करणारी कंत्राटदारांची टोळी

निविदा घोटाळ्यात निलंबनाची कारवाई ही कार्यकारी अभियंता, तत्कालीन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेवर करणे अपेक्षित होते. परंतु जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आमच्या तोंडाला पाने पुसल्याचा आरोप तक्रारकर्त्यांनी केला आहे. जिल्हा परिषदमध्ये कंत्राट मॅनेज करणारी मोठ्या कंत्राटदारांची टोळी सक्रिय असून सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांच्या तोंडचा घास हिसकाविला जात आहे. अशा लोकांचे मुखवटे फाटावेत अशी सगळ्यांना अपेक्षा तक्रारकर्ते करित आहेत.

### इतिहासातील सर्वात मोठा घोटाळा?

महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाने केलेल्या तक्रारीमध्ये प्रशासक राज मध्ये निविदा कमिटी मध्ये असलेल्या अधिकाऱ्यांनी कोट्यवधी रुपयांची आर्थिक नुकसान केले आहे, हा निविदा प्रक्रीयेचा जिल्हा परिषदेच्या इतिहासातील सर्वात मोठा घोटाळा असल्याचे सुध्दा तक्रारदारांनी सांगितले आहे. गेल्या 8, 9 महिन्यापासून केलेल्या तक्रारीचा पाठपुरावा संघटनेने केल्याने घोटाळेबाजांना आपण फसल्याचे कळले होते. आपल्यावरील कारवाई टाळण्याकरिता या घोटाळेबाजांनी साध्या कर्मचाऱ्यालाच बळीचा बकरा बनविला असल्याचे चर्चा चर्वण संपुर्ण जिल्हा परिषद बांधकाम विभागात सुरु आहे. निविदा सूचनेवर ज्यांचे हस्ताक्षर असते, निविदा उघडताना, तांत्रिक मान्यता देताना, ज्यांचे डिजिटल हस्ताक्षर प्रमाणपत्र (डीएससी) लागते असे कार्यकारी अभियंता आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी हे महत्त्वाचे घोटाळेबाज असायला हवे, असा आरोप तक्रारकर्ते करित आहेत. परंतू आपल्या गळ्यातील फास निविदा लिपिकाच्या गळ्यात टाकून हे बडे अधिकारी मोकळे झाले आहेत.



चांदूर रेल्वे- तालुक्यातील सावंगा येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे भाविकांकरिता रविवारी ( 12 जानेवारी ) रोजी सकाळी 10.30 वाजता चांदुर रेल्वे येथून बस सेवा सुरु झाली. 'बस शुभारंभ' प्रसंगी पदाधिकारी आणि विश्वस्तांनी बसचे पूजन करून बस चालक आणि वाहक यांचा संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम वैतागराव नेमाडे यांचे शुभ हस्ते तथा विश्वस्त, कर्मचारी आणि भाविक भक्त यांचे उपस्थितीत शाल व श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला.

# रोजगार हमी योजनेची मजूरी रखडली

### मेळघाटातील मजुरांवर स्थलांतराची वेळ?

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, ( दि.12 ) -** चिखलदरा व धारणी तालुक्यातील महात्मा गांधी रोजगार हमी योजनेत काम करणाऱ्या आदिवासी मजुरांना वर्षभरानंतरही मजुरीची रक्कम मिळालेली नाही. या गंभीर परिस्थितीमुळे अनेक कुटुंबांना उपजीविकेसाठी संघर्ष करावा लागत असून, त्यांच्या मुलांच्या शिक्षण आणि आरोग्यावरही गंभीर परिणाम होत आहे.

मेळघाटातील आदिवासींच्या जीवनासाठी रोजगार हमी योजना म्हणजे आर्थिक आधाराचा मुख्य स्रोत आहे. मात्र, रखडलेल्या मजुरीमुळे कुटुंब हलाखीच्या परिस्थितीत सापडली आहेत. योजनेच्या उद्दिष्टांना हरताळ फासणाऱ्या या समस्येचा तातडीने विचार व्हावा, रखडलेली मजुरी तातडीने अदा झाली नाही, तर आदिवासींना गाव सोडून रोजगारासाठी स्थलांतर करावे लागेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. रखडलेली मजुरी अदा झाल्यास त्यांच्या दैनंदिन जीवनात थोडासा दिलासा मिळू शकेल. आर्थिक संकटाने पिचलेल्या या आदिवासी कुटुंबांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी जिल्हाधिकारी कार्यालयाला दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. निवेदन देताना प्रोहीत अथोटे, प्रशांत आठोले, इंजि. अक्षय अथोटे आणि हर्षल सोनारे उपस्थित होते.



# आमदारांसमोर वाचला विविध समस्यांचा पाढा

## तालुका शाळा बचाव समितीने आ. प्रताप अडसडांना दिले निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.12 )-** तालुक्यातील शासकीय शाळेंत समस्यांचा खच असुन या विविध समस्यांचा पाढा तालुका शाळा बचाव समितीने आमदार प्रताप अडसड यांच्यासमोर वाचला. चांदूर रेल्वे शहरातील शिक्षणाचा दर्जा खालावत असल्याने अनेक नागरिक येथून स्थलांतर होत असल्याचेही समितीने आ. प्रताप अडसड यांच्या निदर्शनास आणून दिले, तसेच उच्च शिक्षण तालुक्याच्या ठिकाणीच मिळणे आवश्यक असल्याचे ही सांगितले. यावर आ. अडसडांनी सकारात्मक प्रतिसाद सदर समितीला दिल्याचे समजते.

चांदूर रेल्वे शहर आणि तालुक्यातील सर्व प्रकारच्या शाळांची स्थिती अत्यंत वाईट झालेली आहे. त्यातल्या त्यात जिल्हा परिषद, नगर परिषदच्या मराठी माध्यमाच्या अनेक शाळा जणू शेवटच्या घटका मोजायला लागल्याचे सर्वविदीत सत्य सर्वांनाच स्पष्ट दिसत आहे. एकेकाळी गजबजलेल्या मराठी शाळा विद्यार्थी संख्येच्या अभावाने विपन्न स्थिती भोगत आहेत. तालुक्यातील शासकीय अनेक शाळांच्या इमारती, त्यातील दारे, खिडक्या मोडकळीस आल्या आहेत, अनेक शाळांना सुसज्ज क्रीडांगण उपलब्ध नाही व असेल तर दुरावस्थेत आहेत व क्रीडा साहित्याचा अभाव आहे. शिक्षक, विद्यार्थ्यांसाठी योग्य स्वच्छतागृहांचा अभाव आहे, अनेक शाळांना योग्य विज्ञान प्रयोगशाळा नाहीत, शाळांमध्ये सफाई कर्मचारी, शिपाई, चौकीदार नाहीत त्यामुळे शालेय स्वच्छतेचा मोठा अभाव आहे, बऱ्याच ठिकाणी संगणक कक्ष आहेत पण ते शिकविण्यासाठी शिक्षकांचा अभाव आहे, शाळांत ग्रथालयांची व स्वतंत्र वाचन कक्षाची व्यवस्था नाही, विद्यार्थ्यांना बसण्यासाठी अनेक शाळेंत बेंचची व्यवस्था नसुन ज्या शाळेत डेक्स, बेंच आहे त्याची अवस्था फारच वाईट आहेत, काही ठिकाणी विद्यार्थ्यांना खाली सतरंज्या टाकून बसविल्या जाते, बऱ्याच ठिकाणी वर्गात पंख्यांचा अभाव आहे, अनेक शाळांत स्वच्छ आणि आरोग्यदायी पिण्याच्या पाण्याचा अभाव आहे, अनेक शाळांमध्ये शिक्षक उपलब्ध नाही यांसह विविध समस्या निवेदनात नमुद करण्यात आल्या आहे. सदरचे निवेदन चांदूर रेल्वे शहरात आमदार प्रताप अडसड यांना देण्यात आले.





# सरपंच, सदस्यांना कक्ष उपलब्ध करावा!

## सरपंच सेवा महासंघ संघटनेची बिडीओंना मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगांव सुर्जी ,( दि.12 )-** अंजनगाव पंचायत समिती येथे सरपंच मंडळींना बसण्याकरिता तसेच ग्रामपंचायत संदर्भात कामकाज करण्याकरिता अंजनगाव पंचायत समितीमध्ये सरपंच कक्ष मिळावा याकरिता अंजनगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी (बिडीओ) यांना निवेदन देण्यात आले.

ग्रामपंचायतशी निगडीत कामे पंचायत समिती येथेच होत असतांना ग्रामीण भागातील सरपंच मंडळी व सदस्यांना ग्रामपंचायत कामकाजा संबधीत कामे करण्यास नेहमीच मुख्यालयी पंचायत समिती येथे ये-जा करावी लागते. परंतु पंचायत समिती येथे सरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य मंडळी आली असता त्यांना बसण्याकरिता कोणत्याच प्रकारचे दालन नसल्यामुळे इतरत्र कुठल्याही ठिकाणी बसून ग्रामपंचायत संमधीत कामकाज करावे लागते. त्यात प्रामुख्याने महिला सरपंच यांना पंचायत समीती कार्यालयात त्रास सहन करावा लागतो.या करीता पंचायत समिती येथे सरपंच कक्ष मिळावा अशी मागणी सरपंच महासंघाचे राज्य अध्यक्ष पुरुषोत्तम घोगरे, अडगाव ग्रामपंचायतचे उपसरपंच माजी सैनिक श्रीधर धांडे यांनी गटविकास अधिकारी एस.एल.खातडे यांना केली आहे.

### अल्पवयीन मुलीला फुस लावून पळविले

**अमरावती –** एका अल्पवयीन मुलीला फुस लावून पळवून नेण्यात आल्याची घटना नागपुरी गेट ठाण्याच्या हद्दीत 11 जानेवारी रोजी उघडकीस आली. एक महिला आपल्या पती व मुलासह अमरावतीत कामासाठी आली होती. त्यावेळी नुमान नसीबउल्ला खान (25) याने त्यांना एका बांधकाम साइटवर नेले. दिवसभर त्यांनी तेथे काम केले. रात्री सर्व तेथेच झोपले. दरम्यान, मध्यरात्री महिलेला आपली लहान मुलगी दिसून आली नाही. त्यांनी तिचा सर्वत्र शोध घेतला. मात्र, तिचा पत्ता लागला नाही. अशात तिला नुमानने पळवून नेल्याचा संशय व्यक्त करीत महिलेने नागपुरी गेट ठाण्यात तक्रार दाखल केली.

### मोबाइल टॉवरवरील 24 बॅटऱ्या लंपास

**अमरावती –** बडनेरा ठाण्याच्या हद्दीतील एका मोबाइल टॉवरवरील 24 बॅटऱ्या चोरून नेण्यात आल्याची घटना 11 जानेवारी रोजी उघडकीस आली. बडनेरातील एका मोबाइल टॉवरवरील विद्युत पुरवठा खंडित होऊ नये म्हणून लावण्यात आलेल्या 48 पैकी 24 बॅटऱ्या अज्ञात चोरट्याने चोरून नेल्या. ही बाब या टॉवरचे तांत्रिक देखभालीचे काम करणाऱ्या तंत्रज्ञ अमोल मनवर (33) यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी बडनेरा ठाण्यात तक्रार दाखल केली.

# मकर संक्रातीला तिळाचे महत्व



**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट, ( दि.12 )-** हिंदू धर्मात मकरसंक्रांत हा सण प्रमुख सणांपैकी एक महत्वाचा सण आहे. या दिवशी सूर्यदेव जेव्हा मकर राशीत प्रवेश करतात तेव्हा मकर संक्रांत हा सण साजरा केला जातो. तसेच हिंदू धर्मात मकर संक्रांतीच्या खास दिवशी स्नान आणि दान करण्याची परंपरा शतकानुशतके पाळली जात आहे. मकर संक्रांतीच्या दिवशी पवित्र नद्यांमध्ये स्नान करून तुम्हाला शक्य असलेल्या वस्तूंचे दान केल्यास पुण्यफल मिळते, असे हिंदू धर्मग्रंथांमध्ये म्हटले आहे. या दिवशी भगवान सूर्याची ही पूजा केली जाते.

मकर संक्रांतीच्या दिवशी तिळाचे लाडू बनवून खाण्याचीही परंपरा आहे. या दिवशी भगवान सूर्याला तीळ अर्पण केले जाते. खरं तर मकर संक्रांतीला तिळाला विशेष महत्त्व आहे. त्याबरोबर काळे तीळ आणि पांढरे तीळ असे दोन रंगांचे तीळ असतात. पण या दिवशी काळ्या तिळाचे महत्त्व जास्त असते. हिंदू धर्माच्या मान्यतेनुसार या दिवशी भगवान सूर्य आणि शनिदेवाच्या आशीर्वादाने काळ्या तिळाचे उपाय प्राप्त होतात. रोग आणि दोषांपासून मुक्ती मिळते, अशी धारणा आहे. मकर संक्रांतीला हिरव्या किंवा लाल रंगाच्या बांगड्या घालाव्यात. मकर संक्रांतीला लाखेच्या बांगड्याला (लाखेचा चुडा) आधिक महत्त्व आहे.

# मेळघाटातील 22 गावे अजूनही काळोखात

### या गावांमध्ये वीज पोहोचलीच नाही

**मारोती पाटणकर**

**चुरणी ( दि.12 )-** देशाला स्वातंर्त्य मिळून 77 वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यासाठी आपण सज्ज झालो. वर्ष पूर्ण झाले असून देशाने विविध क्षेत्रात मोठी प्रगती केली. देशाच्या अनेक क्षेत्रांमध्ये विविध सुख सुविधा पोहचल्या. भारताची चंद्रयान मोहीम सुद्धा यशस्वी झाली. असे असताना सुद्धा महाराष्ट्रातील मेळघाट सारख्या आदिवासी बहुल क्षेत्रात 22 गावांमध्ये वीजच पोहचली नाही.

या गावातील नागरिकांनी रात्रीच्या वेळी वेळेस उजेड पाहिलाच नाही या गावात कधी टेलिव्हिजनचे कोणते प्रोग्राम दिसत नाहीत. या गावातील नागरिकाना दळण सुद्धा दुसऱ्या गावातून आणावे लागते. तर महिलांना अजूनही काही महिलांना जात्यावर दळावे लागत आहे या गावांमध्ये अजूनही जात्यावरची घरघर थांबलेली नाहीसकाळी भल्या पहाटे उठून महिलांना दळण काढावे लागते, अशी भयानक परिस्थिती आहे. तर शाळकरी मुलांना दिव्यांवर अभ्यास अजूनही करावा लागतो, असे भीषण वास्तव अजूनही मेळघाटात आदिवासी पाड्यांमध्ये बघायला मिळतो.

असे अनेक प्रश्न या आदिवासी बांधवांचे या भागात आहेत. या भागातील नागरिक यांची एकच मागणी आहे. साहेब आम्ही सुद्धा माणसं आहो आम्हालाही जगायचं अधिकार आहे. मेळघाटातील या 22 गावांमध्येच का अंधार आहे असा प्रश्न आदिवासी बांधव उपस्थित करतात.



### या गावांमध्ये वीज पोहोचलीच नाही

रायपूर, बोराट्याखेडा, रेहट्याखेडा, सरवारखेडा, मारिता, सुमिता, खुटिदा, खडीमल, चुनखडी, नवलगाव, सिच्छुखेडा, माळीझडप, माखला, आवागड, घाणा, खंडूखेडा, चौपान, कोपमार, रंगूबेली, कुंड, किनीखेडा, खामदा, ढोकळा, रक्षा, सलीता या गावांमध्ये अजूनही वीज पोहोचलेली नाही.

या भागातील अनेक गावांमध्ये अजूनही वीज पोहोचलेली नाही. त्यामुळे या ठिकाणच्या मुलांच्या शिक्षणावर त्याचा परिणाम होतो. या भागातील निरक्षरतेचे प्रमाण फार जास्त आहे. यासह ऑनलाइन चे कोणतेही कामे होत नाहीत. गावात वीज नसल्यामुळे रात्रीच्या वेळी जंगली जनावरांचे सुद्धा वावर असतो. त्यामुळे या भागात अनेकदा जीवित हानी सुद्धा होते. याबरोबरच टेलिव्हिजन व इतर सुख सुविधा आमच्या भागातील नागरिकांना मिळत नाहीत. शेतीचे सुद्धा नुकसान होत आहे. शेतीमध्ये वीज कनेक्शन नसल्यामुळे उत्पादनात फार फरक पडतो. तरी शासनाने या भागात वीज तात्काळ सुरू करावी.

**नानकराम ठाकरे,**
**माजी उपसभापती, पंचायत समिती, चिखलदरा.**

22 गावांमध्ये अजूनही वीज पोहोचलेली नाही आम्ही अनेक वेळा निवेदन दिलेत, परंतु उपयोग नाही. या भागातील नागरिकांना दुसऱ्या गावातून दळण आणावे लागते. कधी कधी मध्य प्रदेशातून सुद्धा दळण आणावे लागते. शेती, ऑनलाईची कामे सर्व काही प्रभावित होत आहे.

**भैयालाल मावस्कर,**
**सामाजिक कार्यकर्ते तथा उपसरपंच.**

# शिवाजी शाळेत स्काऊट गाईड सेवा महोत्सवाचे आयोजन

## विविध वस्तू विक्रीतून विद्यार्थ्यांनी केली खरी कमाई

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.12 ) -** विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्व समजावे, त्यांच्यात श्रम मूल्य वृद्धिंगत व्हावे, श्रम करण्याची सवय जडावी व त्यांना व्यावहारिक ज्ञान प्राप्त व्हावे या उद्देशाने स्थानिक शिवाजी उच्च माध्यमिक शाळेत स्काऊट गाईड सेवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. खरी कमाई हा एक शिक्षणाचाच भाग असून यामाध्यमातून कब, बुलबुल, स्काऊट आणि गाईड यांना स्वावलंबी बनवण्यासाठी स्वकष्टाने चार पैसे कसे कमवायचे याचे प्रशिक्षण स्काऊट गाईड या पथकाच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना करून दिले.

खरी कमाई या उपक्रमा अंतर्गत स्काऊट व गाईड पथकातील विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरात विविध खाद्य पदार्थ व शाळेत असलेल्या परस बागेतील भाजी पाल्यांची विक्री करून त्याचप्रमाणे स्वहस्ते बनवलेल्या कापडी पिशव्यांच्या विक्रीतून पैसे कमावण्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.याप्रसंगी झालेल्या कार्यक्रमाला श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सदस्य नाना पाटील, महादेव नवघरे, संजय उल्हे, शरद कनेर, संजय गारपवार, अजय पाटील शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख, पर्यवेक्षक मिलिंद ढाकुलकर, अशोक चौधरी उपस्थित होते. या संपूर्ण महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी प्रेमा नवरे, विशाखा ठाकरे, विजया रोकडे, योगेंद्र खोडे, मनीष केचे, सारंग जाणे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



